# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, फेब्रुवारी ७, १९९७ / माघ १८, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या
भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

**भाग चार - ब**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिध्द केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी, १९९७

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.

क्रमांक पीडब्ल्यूआर.११९६/प्रक्र.२९६/प्रक्र.१७/ल-२ - महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) याचे कलम ३३०-अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे असे निदेश देत आहे की, उक्त अधिनियमाची कलमे ५३, ५४, ५४-अ याखालील जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक, उप विभागीय वन अधिकारी आणि उप वनसंरक्षक यांना त्यांच्या अधिकारितेतील शासनाची राखीव वनें, संरक्षित वने म्हणून जाहीर केलेल्या जमिनींच्या व त्यांच्या ताब्यातील अन्य जमिनींच्या संबंधात करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

अजित वर्टी
शासनाचे प्रधान सचिव